August - 2017 E-ISSN: 2321-4953

# IRFA's UNIRESEARCH


Multidisciplinary International E-Research Journal

Vol.- IX Issue - II

*Indexed in DRJI & Indian Citation Index Double Blind Peer Reviewed Journal*

UGC Approved List No. 63005 *Cosmos Impact Factor - 3.020 [2015]*

मराठी साहित्य संशोधन विशेषांक – भाग ४




**Editor:**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Asst. Professor, Dept. of Marathi,
M.G.V.'s Arts & Commerce College, Yeola.
Nashik [M. S.] India.
dhanrajdhangar@gmail.com
Mobile No. 7775982534

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS

*For Details, visit us on: www.uniresearch.net.in*

International Research Fellow Association's

# अनुक्रमणिका


| अ.नं. | शोध निबंधाचे शीर्षक | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 1 | आदिवासी कामड नृत्यगीते एक अभ्यास | डॉ अंजली म्हस्करेन्हस | 04 |
| 2 | लोकगीतातील आई एक चिंतन | प्रा. दीपक सूर्यवंशी | 12 |
| 3 | लोकसाहित्य व लोककला | प्रा. तुकाराम कांबळे | 16 |
| 4 | महानुभावीय वाङ्मयातील स्वदेश व स्वभाषाभिमान | डॉ. दिनेश पाटील | 21 |
| 5 | भारतीय संत साहित्य | प्रा. कविता पाटील | 24 |
| 6 | संत एकनाथ समन्वय बुद्धीचे आदर्श सुधारक | डॉ गोपाल ढोले | 28 |
| 7 | संत एकनाथांच्या भागवतातील समतेचा विचार | डॉ. धनराज धनगर | 33 |
| 8 | संत साहित्य : परिवर्तनीय आकलन | डॉ. विजया राऊत | 36 |
| 9 | संत एकनाथांचे भारुड विश्व | प्रा. परिणीता घडूले | 40 |
| 10 | विदर्भातील संत परंपरा | डॉ गजानन हेरोळे | 46 |
| 11 | भारतीय संस्कृती, इतिहास आणि संत साहित्यावरील बौद्ध धर्माचा प्रभाव | प्रा. संगीता सूर्यवंशी | 49 |
| 12 | मराठी कादंबरीतील संस्कृतीचा प्रश्न ( जागतिकीकरणाच्या संदर्भात) | डॉ प्रभाकर देसाई व प्रा. कैलास सलादे | 61 |
| 13 | यशवंतराव चव्हाण यांचे वक्तृत्व व भाषणे | डॉ. तुषार चांदवडकर | 65 |
| 14 | जी.एं.च्या कथेतील प्रतिके व प्रतिमा | डॉ अन्नपूर्णा चौधरी | 69 |
| 15 | मी तोडले तुरुंगाचे दार या काव्यसंग्रहातून अभिव्यक्त झालेली समकालीनता | प्रा भीमराव वानोळे | 72 |
| 16 | कृषिजन संस्कृतीचे वास्तव आणि राजन गवस यांची कळप कादंबरी | डॉ दीपक बावस्कर | 76 |
| 17 | साठोत्तरी ग्रामीण कादंबरीमधील समाज जीवनाचे वास्तव चित्रण | प्रा कैलास वाघ व डॉ. वसुमती पाटील | 85 |
| 18 | उत्तम बंडू तुपे हयांच्या कादंबरीलेखनातील पृथगात्मता | प्रशांत महाजन | 88 |
| 19 | ग्रामीण जीवनाचा अचूक वेध घेणारा कथा संग्रह 'उठावण' | प्राचार्य डॉ. भाऊसाहेब गमे | 90 |
| 20 | साठोत्तरी मराठी स्त्रीवादी साहित्याची पार्श्वभूमी व वाटचाल | डॉ. साहेबराव शिंदे व प्रा. मंगेश अटकोरे | 93 |
| 21 | साठोत्तरी मराठी साहित्य : आदिवासी कविता | प्रा डॉ गणेश टाले | 97 |
| 22 | नव्वदोत्तर मराठी आदिवासी कविता | प्रा. रेखा इंगोले | 103 |
| 23 | आदिवसिंच्या आर्थीक क्रांतीचा उदय आदिवासी अकादमीची निर्मिती | अजीज तडवी | 109 |
| 24 | साहित्याची समीक्षा : संज्ञा, संकल्पना व स्वरूप | प्रा. उज्ज्वला पाटील | 115 |
| 25 | नव्वदोत्तरी मराठी आदिवासी साहित्यातील विद्रोह | डॉ. राजेंद्रकुमार लोणे | 119 |
| 26 | साठोत्तरी मराठी साहित्यात दलित साहित्याचे योगदान | प्रा. रुपाली पाटील | 126 |
| 27 | प्रसार माध्यमांचे बाजारीकरण | डॉ. शीला गाडे | 130 |

# मराठी कादंबरीतील संस्कृतीचा प्रश्न

(जागतिकीकरणाच्या संदर्भात)

डॉ. प्रभाकर देसाई,
सहयोगी प्राध्यापक , मराठी विभाग,
सा.फु.पुणे विद्यापीठ, पुणे.
Desai.critic@gmail.com / 9881908020.

प्रा. कैलास सलादे, ,
सा.प्राध्यापक , मराठी विभाग,
कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
ओझर मिग,ता. निफाड,जि. नाशिक
Kailas.salade@gmail.com / 9921528421

**प्रस्तावना**

जागतिकीकरण हा शब्द १९९० नंतर भारतीयांचा परिचयाचा बनला.१९९० मध्ये डंकेल प्रस्तावावर स्वाक्षरी केल्याने मुक्त अर्थव्यवस्थेच्या रुपाने जागतिकीकरणाचा प्रवाह प्रवेशकर्ता झाला. या जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेने विकासाचे दिव्य स्वप्न उभे करुन भाषा, संस्कृती, पर्यावरण, ज्ञानव्यवस्था, मूल्यव्यवस्था, परंपरा आणि जीवनपध्दती नष्ट करण्याचा चंग बांधला. जागतिकीकरणाला प्रतिक्रीया म्हणून देशीयता आणि देशीवाद या संकल्पना पुढे आल्या. मुळात नेटीव (Native) या शब्दापासून देशीवाद आणि देशीयता या संकल्पना सिध्दांताची मांडणी केली गेली. सांस्कृतिक आक्रमणात परकीयांनी स्थानिकांवर नुसती सत्ता-राजवटच स्थापन केली असे नाही. तर इथल्या स्थानिक जात-समूहांच्या भाषा, संस्कृती, परंपरा, आहार, वस्त्र, धर्म आणि मूल्यव्यवस्था यावर आघात करुन त्यांचे अस्तित्व धोक्यात आणले व आपलीच संस्कृती श्रेष्ठ ठरवून इथली संस्कृती आणि ज्ञानपरंपरा कनिष्ठ लेखून तिला नष्ट करण्याचा आक्रमक प्रयत्न वसाहतवादी व साम्राज्यवादी जागतिकीकरणाने केला. मुळात साहित्य आणि संस्कृतीचा विचार अभ्यास करताना इथल्या समूहाच्या देशीय परंपरा, मूल्यव्यवस्था, ज्ञानपरंपरा, संस्कृती तत्वे व आदर्शाचा विचार करायला हवा. हे देशीवादी विचारवंताचे म्हणणे आहे. मात्र जागतिकीकरणाने देशी परंपरेला आणि संस्कृतीला पायदळी तुडवले. त्यातूनच अस्तित्वाचा आणि संस्कृतीचा प्रश्न तीव्र टोकदार बनला आहे.

**जागतिकीकरणाने निर्माण केलेले संस्कृतीचे प्रश्न :**

जागतिकीकरणाने साहित्य, संस्कृती, समाज, भाषा, पर्यावरण, मूल्यव्यवस्था व समाजधारणा ह्या सगळयांवर कुरघोडी करुन त्यांची गळचेपी करण्याचा यशस्वी प्रयत्न केला.यातून सांस्कृतिक संघर्ष तीव्र होत गेला.म्हणून २१व्या शतकाचे प्रारंभीचे दशक हे तीव्र संवेदनशीलतेचे दशक मानावे लागते.आंतरराष्ट्रीय घडामोडीचा अभ्यास केला तर दहशतवाद, नक्षलवाद, मूलतत्ववाद, पर्यावरण बचाव चळवळी, देशांतर्गत छूपे संघर्ष, आंतरराष्ट्रीय पातळीवरील अदृश्य महायुध्दे या सर्व चकमकीमागे जागतिकीकरणाने तीव्र केलेला सांस्कृतिक प्रश्नच आहे. प्रत्येक संस्कृतीच्या अस्तित्व टिकविण्यासाठी तीव्र झालेल्या सांस्कृतिक अस्मिता आणि जाणिवा दिवा विझताना जसा भडकतो तशा भडकल्या आहेत. त्यामूळे जागतिकीकरणात संस्कृतीचा प्रश्न टोकदार संवेदनशीलतेचा तीव्र मुद्दा बनणार आहे.

ह्या तीव्र बनलेल्या सांस्कृतिक संघर्षात जागतिकीकरणाची संकल्पना समजावून घ्यावी लागते. आपण ज्या जागतिकीकरणाची चर्चा करतो आहे त्याची सुरुवात एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आधुनिकतेबरोबर झाली. इ.स.१८७० नंतर जागतिकीकरणाला सुरुवात झाली असे मानले जाते. जागतिकीकरण ही संकल्पना १९९० नंतर चर्चेत आली असली तरी १८८३मध्ये हार्वर्ड बिझिनेस स्कूलच्या थिऑडोर लेव्हिड यांनी यावर एक

लेख लिहिला होता. मात्र जागतिकीकरणाची सुरुवात प्राचीन काळापासूनच झालेली दिसते. प्रारंभ आर्यांच्या टोळ्यांपासून आणि त्यांनी स्थापन केलेल्या यज्ञसंस्थेपासून झाला. कारण या वृत्तीच्या लोकांचे धोरण मुळीच कृषीचे व कृषिवल्लांचे शोषण हेच होते.[१] वेदः कृषिविनाशाय कृषिवेदविनाशी ही आर्यसंस्कृतीची भूमिका होती. आर्यांच्या आक्रमणांनी इथल्या मुळच्या संस्कृतीवर आपली संस्कृती लादली. कृषी विरुद्ध ऋषी हा सांस्कृतिक संघर्ष उभा राहिला. यज्ञसंस्कृतीने निसर्गसंस्कृतीवर केलेले आक्रमण हे ह्या सांस्कृतिक संघर्षाचे स्वरुप होते. आर्यानंतर कुशाण, हुण, अरब, ग्रीक, अभीर, मुघलादी मुसलमान टोळ्यांनी आणि राज्यकर्त्यांनी भारतावर आक्रमण करुन राजवटी स्थापन केल्या. त्यांनीही आपली संस्कृती पराजितांवर लादली. त्यावेळी सांस्कृतिक संघर्ष झाले नाही असे नाही. पण त्या सांस्कृतिक संघर्षाची तीव्रता आताच्या संस्कृती प्रश्नाइतकी टोकदार नव्हती. कारण या काळातील सर्व संस्कृत्यांनी समन्वयाची आणि संस्कृतिसंगमाची भूमिका घेतली. मूळच्या आदीम संस्कृतीत एकजीव झाल्या. त्यामुळे संस्कृतीचा प्रश्न तीव्र बनला नाही. इंग्रजांच्या वसाहतवादी आणि व्यापारवादी संस्कृतीपासून संस्कृतीचा प्रश्न तीव्र झालेला दिसतो. इंग्रजांनी आपली संस्कृती इंग्रजत्तेरांवर लादली. आपले सांस्कृतिक संघर्षाला स्थळ-काळ-स्वरुपाच्या काही मर्यादा होत्या. मात्र १९९० नंतर आलेले बहुसांस्कृतिक वर्चस्ववादी संस्कृतीच्या आक्रमणाने संस्कृतीचा प्रश्न गुंतागुंतीचा बनला आहे.

जागतिकीकरण हे काही एकदम उगवलेलं नाही. त्याला एक फार मोठी राजकीय परंपरा आहे. सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा विचार आहे. जागतिकीकरण ही मूलतः आधुनिकीकरणाची आर्थिक अभिव्यक्ती आहे.[२] या जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेने जगाचा चेहऱा-मोहरा बदलला आहे. देशा-देशांर्गत काल्पनिक सीमारेषा नष्ट झाल्या आहेत. मुक्त बाजार व्यवस्थेने जागाची बाजारपेठ झाली आहे. जागतिकीकरणाने जुन्या व्यवस्थेवर वर्चस्व प्रस्थापित करुन जगाचा नकाशा बदलविला आहे. म्हणून जागतिकीकरण हे जगभराच्या सांस्कृतिक स्थितीमधील बदल आणि उत्तराधुनिक संपर्क स्थितीत संस्कृतीवरील शस्त्रक्रिया[३] ठरते. जागतिकीकरणात वसाहतवादी राष्ट्राच्या भाषा, आहार, वस्त्र, धर्म, मूल्यपरंपरा आणि संकेतव्यवस्था या सांस्कृतिक घटकांचाही प्रसार होतो किंवा जाणिवपूर्वक केला जातो. त्यातून आपली संस्कृती संकुचित होतेय किंवा नष्ट केली जातेय ही भावना त्या स्थानिक समुदायाच्या मनात निर्माण होते. त्यातून संस्कृतीचा प्रश्न संवेदनशील बनतो.

जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेत फक्त संस्कृतीवरच आक्रमणे केली जातात असे नव्हे. तर मूल्यव्यवस्था आणि विचारप्रक्रीया यावर हुकूमत मिळवून वैचारिक गुलामगीरी प्रस्थापित केली जाते. त्यामूळे स्वतःची ज्ञानव्यवस्था व जीवनपध्दती कमीपणाच्या वाटू लागतात. महाराष्ट्रात इंग्रजी शिक्षणपद्धतीला अवाजवी महत्व दिल्याने मराठी ज्ञानपरंपरा कमी लेखली गेली. जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेने जगाचे आखीव-रेखीव परिप्रेक्ष्य बदलले गेले. कारण जागतिकीकरण हे मानवी व्यवहार व ज्ञानाच्या स्थिती जागतिक असल्याचे दर्शविते. जागतिकीकरणामुळे स्थळ-काळाच्या रुपरेषामध्ये मूलतः बदल घडून आला आहे.[४] समाजाच्या अस्मितेची भूक प्रचंड प्रमाणात वाढली असून स्वतःच्या अस्मितेचा शोध सुरु झाला आहे. यातून संस्कृतीचा प्रश्न धारधार बनणार आहे.

मुळात संस्कृती कधीच स्थिर नसते. ती नदीसारखी प्रवाही असते. ती आपला मूळगाभा तसाच ठेऊन आपल्या बाह्यांगात परीवर्तन करण्यास नेहमीच उत्सूक असते. मात्र हे परावर्तन-बदल तिच्या कलाने झाले पाहिजे. आतापर्यंत संस्कृतीने कितीतरी परावर्तने स्वतःत पचवले आहे. व सांस्कृतिक वर्चस्वाचे अनेक हल्ले

परतवलेले आहेत. उत्तम कांबळे यांनी संस्कृतीचे एक निरीक्षण नोंदवले आहे. ते म्हणतात, संस्कृती म्हणजे अशी स्थिर गोष्ट नसते. ती माणसाच्या जीवनाशी जोडलेली असते.जीवन बदलत जातं. संस्कृतीही बदलत जाते.[५] जागतिकीकरण ही व्यापार, भांडवल, गुंतवणूक, तंत्रज्ञान व माहिती यांची एकात्म स्वरुप असलेली बाब म्हणता येईल. जागतिकीकरण म्हणजे जागतिक बाजारपेठेतून सर्व राष्ट्रात मुक्त वाहणे होय. कुठलीही बाब, व्याप्ती व उपाययोजना वैश्विक किंवा जगभर करणे म्हणजे जागतिकीकरण होय.[६] अशा घटकांबरोबर मूल्ये आणि संस्कृती ह्या स्थानिक राष्ट्रांच्या मूल्यव्यवस्थेत मिसळतात. त्यांना राजकीय विचारसरणीचे स्वरुप प्राप्त होते. ही राजकीय भूमिका गरज म्हणून तिला समर्थन प्राप्त होते.मग हे जागतिकीकरण निव्वळ आर्थिक राहत नाही. त्याला सामाजिक राजकीय तात्विक बाजूही प्राप्त होतात.[७]

जागतिकीकरणासोबत त्या देशातली संस्कृती नष्ट करुन आपली संस्कृती प्रस्थापित करताना सांस्कृतिक संघर्ष घडतो. या सांस्कृतिक संघर्षात जागतिकीकरण आणि कृषिसंस्कृती यांच्या क्रिया- प्रतिक्रीया जाणून घेणे हा या लेखाचा मानस आहे. आदिम अशा निसर्गसंवादी कृषिसंस्कृतीवर प्राचीन काळापासून अनेक संस्कृत्यांची आक्रमणे झालेली असली तरी तिच्या अंतरंगात फारसा गहिरा परीणाम झालेला दिसत नाही.मात्र जागतिकीकरणाच्या प्रवाहाने कृषिसंस्कृती नष्ट होतेय काय? या प्रश्नावर विचारमंथन करण्याची तातडीची गरज निर्माण झाली आहे.जागतिकीकरणाने कृषिसंस्कृतीत काय परावर्तने येणार आहे? त्यामुळे कृषिसंस्कृतिचे स्वरुप बदलेल काय?पर्यावरण आणि कृषिसंस्कृती यातील संवादी स्वरुप हरवून परात्म बनेल काय? कृषिसंस्कृतीचा हा सजिवंत चैतन्यशील प्रवाह जागतिकीकरणांच्या बांध बंधिस्तीने थांबविला जाईल का? अशा अनेक प्रश्नांना येणा-या काळाला उत्तर द्यायचे आहे.

संस्कृती विचारात आजपर्यंत कोणतीही संस्कृती ही एका दिवसात निर्माण झालेली नाही.त्यामुळे ती एका दिवसात नष्टही होणार नाही.कारण संस्कृती ही त्या लोक समूहाची जगण्याची पध्दती ,त्या समूहाच्या चाली-रिती,आचार-विचार,रूढी-प्रथा-परंपरा,संकेत,भाषा,कला,साहित्य ,समजूती इत्यादीची व्यवस्था असते.[८] ह्या व्यवस्थेची पध्दतशीर मुस्काटदबी करुन तिची उपयुक्तता नष्ट केली जाते.त्यावेळी संस्कृतीचा –हास सुरु होतो.जगातल्या कितीतरी संस्कृत्या काळाच्या ओघात नष्ट झाल्या आहे.मग कृषिसंस्कृतीही नष्ट होईल का? मुळात कृषिसंस्कृतीच्या मूळधारणेत वेगाने बदल घडू लागले आहे.उपयुक्ततेचा विचार केला तर कृषीची उपयुक्तता आजही संपलेली नाही.त्यामुळे प्रा.मोहन पाटील यांनी एक निरक्षण नोंदवलेय ते महत्वाचे आहे.ते म्हणतात की जोपर्यंत शेती आहे तोपर्यंत शेतीसंस्कृतीही टिकून राहणार.कारण कृषिसंस्कृती ही प्राचीन अशी संस्कृती आहे. अनेक आघात सोसूनही आज ती टिकून आहे.आजपर्यंत ती टिकून रहाण्याचं महत्वाचे कारण म्हणजे इथल्या स्थानिक समूहाचं शेती हेच उपजीविकेचे महत्वाचे साधन होते. धन-धान्याची समृध्दी आणि गोधन रक्षण हे कृषिसंस्कृतीचे वैशिष्ट्ये ठरले होते.कृषिसंस्कृतीत पर्यावरणाला अत्यंत महत्व दिले होते.[९] जोपर्यंत शेती आहे.म्हणजे जोपर्यंत शेतीची गरज भासणार आहे.म्हणजेच जोपर्यंत यंत्रात गहू-बाजरी धान्य तयार करण्याची कला अवगत होणार नाही.तोपर्यंत कृषी कला पर्यायाने कृषिसंस्कृती टिकून रहाणार आहे.कृषिसंस्कृती ही सहजा-सहजी नष्ट होणार नसली तरी तिच्या आंतर बाह्य भागात फार मोठे मोठे परावर्तने येऊ घातले आहे.शेती आहे तोपर्यत कृपिसंस्कृती उरणार असा आशावाद व्यक्त करणारे प्रा.मोहन पाटील बदलत्या सांस्कृतिक स्थित्यंतराचे निरीक्षण नोंदवून धोकावजा इशाराही देतात. जागतिकीकरणाच्या प्रक्रीयेत सेझसारख्या व्यापारी आघातामध्ये उपजावू शेतीचे रूपांतर उद्योग क्षेत्रामध्ये होईल तर ही संस्कृती नष्ट व्हायला उशीर लागणार नाही.[१०]

जागतिकीकरणाने निर्माण केलेली संस्कृती ही उपभोगवादी आहे. Use and throw ही तिची मूल्यव्यवस्था आहे.कृषिसंस्कृतीची मूल्यव्यवस्था भोगवादी व्यवस्थेच्या विरोधी आहे.भोगवादी संस्कृती उपभोग हे थोर मूल्य घेऊन येते. निसर्ग पर्यावरण ह्या बिनमहत्वाच्या गोष्टी.त्यांचा नाश करणे हेच जगण्याचे कर्तव्य बनते. यामा-यात माणसालाही बाजारातील वस्तूचे स्वरूप प्राप्त होते.माणसे विकत घेणे-विकत जाणे हा स्वभाव बनतो.[११]

त्यामुळे कृषिसंस्कृतीचा जागतिकीकरणाने लादलेल्या संस्कृतीशी संघर्ष अटळ ठरतो.कृषिसंस्कृतीची स्वतःची मूल्यव्यवस्था, ज्ञानपरंपरा, रुढी-प्रथा, धर्मव्यवस्था, ग्रामव्यवस्था, वस्त्रसंस्कृती, आहारसंस्कृती, पर्यावरणीय समतोलाचा प्रश्न, यासारख्या घटकांमध्ये मोठ्या वेगाने बदल घडू लागले आहे. यंत्रसंस्कृतीच्या हस्तक्षेपामूळे कृषिसंस्कृतीतल्या परीवर्तनाचे चित्रण आनंद यादव यांच्या गोतावळा या कादंबरीत आले आहे. यंत्रसंस्कृतीचा प्रतिनिधी ट्रॅक्टर हा पारंपारीक ग्रामीण जीवनाला छेद देतो.शेतमजुराचे अस्तित्व धोक्यात येते.पारंपारीक शेतीसंस्कृतिचा ह्रास होतो.[१२]

**सारांश :**

कृषिसंस्कृतीची स्वतःची मूल्यव्यवस्था आणि निसर्ग पर्यावरणपूरक धारणा आहे.ही मूल्यव्यवस्था व धारणा जागतिकीकरणाच्या विरोधी असल्याकारणाने संस्कृतीचा प्रश्न उभा राहतो.जागतिकीकरणाने जी व्यापारी-भोगवादी संस्कृती निर्माण केली आहे.ही संस्कृती भौतिक सुखाला लालचावल्यामुळे प्रत्येक गोष्टीची प्रचंड नासाडी हा इथला जीवनधर्म बनतो.पशू-पक्षी,प्राणी-कीटक ह्या बिनगरजेच्या आणि तापदायक गोष्टी बनतात.त्या नष्ट करण्याचा विडा उचलला जातो.[१३] निसर्गाचा करता येईल त्या गोष्टीचा विध्वंस आणि त्यातून आपल्या सुखाचा शोध ही जागतिकीकरणाची मुख्य भूमिका आहे.त्यामुळे या सांस्कृतिक संघर्षात अनेक जात-समूह वर्गाच्या संस्कृती प्रश्नाचा लढा महत्वाचा ठरतो. स्वतःच्या संस्कृतीचा त्याग करून माणूस सहजा-सहजी दुसरी संस्कृती स्वीकारत नाही.दुस-याने लादलेली उपरी संस्कृती एक व्यवहारिक गरज म्हणून स्वीकारताना अंतर्मनात सांस्कृतिक संघर्ष हा चालूच असतो कारण आपल्या अस्तित्वाचा प्रश्न आणि आपले वेगळेपण जपण्याकडे मानव समूहाचा कल असतो. जागतिकीकरणाने मात्र अनेक मानवी समूहाचे, संस्कृतीचे अस्तित्व धोक्यात आणले आहे. त्यामूळे जागतिकरणाच्या विचारमंथनात संस्कृतीचा प्रश्न महत्वाचा ठरतो.

---

**संदर्भ :**


१. पाटील मोहन, ग्रामीण साहित्य आणि संस्कृती,स्वरुप प्रकाशन औरंगाबाद,तिसरी आवृत्ती-सप्टें.२०१३,पृ.१५९.

२. कांबळे उत्तम (संपा.), जागतिकीकरणातील सांस्कृतिक संघर्ष,सुगावा प्रकाशन पुणे,प्र.आ.-२०१३,पृ.४१.

३. पाटील आनंद, समीक्षा अपहरण, रजत प्रकाशन औरंगाबाद,प्र.आ.-२०१०,पृ.८७.

४. कांबळे उत्तम (संपा.),उनि.पृ.९७.

५. तत्रैव,पृ.५,संपादकीय.

६. पाटील आनंद,उनि.पृ.८५.

७. कांबळे उत्तम (संपा.),उनि.पृ.११५.

८. पाटील संभाजी, राजन गवस यांच्या समग्र साहीत्यातून व्यक्त झालेल्या भूमिनिष्ठ जीवन जाणिवांचा चिकीत्सक अभ्यास, (अप्रकाशित प्रबंध),मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद,सादर-३१ डिसें.२०१२.

९. देखणे रामचंद्र,संतसाहित्यातील पर्यावरण विचार,पद्मगंधा प्रकाशन पुणे,व्दि.आ.-२००४,पृ.११.

१०. पाटील आनंद ,उनि.पृ.१६८.

११. गवस राजन, कृषिजन संस्कृतीचे साहित्य, शब्दालय दिवाळी अंक, संपा-सुमती लांडे,शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर,२००३,पृ४३.

१२. पाटील तानाजी, मराठी कादंबरीःसमीक्षा,डायमंड पब्लि.पुणे,प्र.आ.-२००९,पृ.४.

१३ गवस राजन, ऊनि.पृ.४२.